# माझं स्वतःच पुस्तक





आपल्या सर्वांना इंग्लिश भाषेची बाराखडी माहिती आहे का? आज आपल्याला ती एका वेगळ्या पद्धतीने शिकायची आहे तुम्हाला माहिती आहे कि आपण इंग्लिश मधील a , b , c , d शिकण्यासाठी वेगवेगळी पुस्तके वापरतो. कुणाच्या पुस्तकात रंगीत बाराखडी दिलेली असते तर कुणाच्या पुस्तकात सरळ साध्या पद्धतीत बाराखडी छापलेली असते. आपण जर स्वतःच आपलं असं बाराखडी शिकण्याचं पुस्तक तयार करू शकलो तर? मज्जा येईल ना?

**<u>आज आपण आपले स्वतःचे एक छान इंग्लिश बाराखडीचे पुस्तक तयार करूया.</u>**


पुस्तक बनविण्यासाठी आपले फक्त एक कोरी वही किंवा रजिस्टर, पेन्सिल आणि कलर पेन लागणार आहेत.

आता तुम्ही याआधी पाहिलेले इंग्लिश बाराखडीचे पुस्तक आठवून पहा त्यात प्रत्येक बाराखडीपासून एकेक शब्द तयार केलेला असतो, हो ना? जसं कि A पासून अँपल, B पासून बॉल , C पासून कॅट , D पासून डॉग इत्यादी. पण आपल्या पुस्तकात आपल्याला प्रत्येक इंग्लिश बाराखडीपासून दोन दोन शब्द तयार करायचे आहेत. आधी प्रत्येक बाराखडीपासून दोन इंग्लिश शब्द आपण इतर कुठेतरी लिहून ठेऊया. तुम्हाला माहिती आहे कि इंग्लिश मध्ये एक मोठी बाराखडी असते तिला कॅपिटल लेटर असे म्हणतात आणि एक छोटी बाराखडी असते तिला स्मॉल लेटर असे म्हणतात. आपण एका बाराखडीपासून जे २ शब्द तयार केलेले आहेत, एक मोठ्या बाराखडीसमोर आणि लहान बाराखडी समोर लिहायचे आहेत.




असे प्रत्येक बाराखडीपासून दोन दोन शब्द तयार करण्यासाठी आपल्याला दोन वेगवेगळे प्रकार आधी ठरवावे लागतील जसं की फळे आणि प्राणी. मग मोठ्या बाराखडीपासून फक्त फळांची नावे शोधून काढायची आणि लहान बाराखडीपासून फक्त प्राण्यांची नाव शोधून काढायची म्हणजे आपल्याला नाव शोधायला जरा सोपं जाईल. आता येवूयात आपल्या पुस्तकाच्या डिजाईन कडे. आपल्या वहीच्या प्रत्येक पानाला अनुक्रमे एक नंबर देयचा आहे. आपण वाटलं तर सम संख्या आणि विषम संख्या वेगवेगळ्या कलर ने देखील काढू शकतो म्हणजे त्या निमित्ताने आपल्या सॅम संख्या आणि विषम

संखेतील फरक देखील लक्षात राहील. यानंतर आपण आपल्या शिक्षकांच्या मदतीने सुरवातीला एखादे अक्षर किंवा शब्द लिहून घेऊ आणि त्यावरून आपल्या पुस्तकात आपल्या स्वतःच्या हाताने तो लिहून काढू. आपल्याला सुरुवातीला याचा खूप सर्व करावा लागू शकतो जेणेकरून पुस्तकात ते अक्षर लिहिताना जास्तीत जास्त सुंदर दिसेल. वाटलं तर आपण एखाद्य दुसऱ्या पुस्तकातील अक्षराचे कात्रण देखील आपल्या पुस्तकात चिकटू शकतो म्हणजे आपले पुस्तक  आकर्षक होईल.







आपली अक्षरे आणि शब्द लिहिताना आपल्याला आणखी एका गोष्टीवर लक्ष ठेवायचे आहे. आपल्या इंग्लिश बाराखडीमध्ये A , E , I , O आणि U असे पाच स्वर आहेत, ते आपल्याला वेगळ्या कलर ने रेखाटायचे आहेत. आणि त्यापासून टायर होणारे शब्द देखील वेगळ्या कलर ने लिहायचे आहेत. तुम्ही यासाठी आपल्या शिक्षकांची देखील मदत घेऊ शकता.

आता आपल्याला पुस्तकाचा सारांश कळला असेल. आता यापुढे आपल्याला प्रत्येक दिवशी नवीन चार अक्षरे निवडायची आहेत आणि प्रत्येक दिवशी फक्त चार  अक्षरावर काम करायचे आहे. म्हणजे प्रत्येक दिवशी आपल्या पुस्तकाचे एक नवीन पान तयार होत जाईल. आणि प्रत्येक पानावर पान क्रमांक देखील लिहायचा आहे.






आणि आधी सांगितल्याप्रमाणे पान क्रमांक टाकताना सम आणि विषम संखेसाठी वेगळा कलर वापरायला विसरू नका. पहिल्या दिवशी Aa  , Bb  , Cc आणि Dd हि चार अक्षरे झाली. आता दुसऱ्या दिवशी Ee , Ff , Gg आणि Hh  हि अक्षरे होतील आणि याच पद्धतीने उर्वरित Ii , Jj , Kk , Ll , Mm , Nn , Oo , Pp , Qq , Rr , Ss , Tt , Uu , Vv , Ww , Xx , Yy आणि Zz हि अक्षरे होतील.

आपले हे नवीन पुस्तक तयार होत असताना आपल्याला आणखीन नवीन नवीन गोष्टी शिकण्यास संधी आहेत. एकदा का आपल्याला सर्व अक्षरांपासून प्रत्येकी दोन शब्द (मोठ्या बाराखडीपासून फळे किंवा भाजीपाला आणि लहान बाराखडीपासून प्राणी किंवा पक्षी) सापडले कि आधी ते आपल्याला इतर कुठेतरी लिहून ठेवायचे आहेत. त्यानंतर त्याचा व्यवस्थित सर्व करूनच आपल्याला ते आपल्या पुस्तकात लिहायचे आहेत. अशा प्रकारे पूर्ण शब्द आपल्याला पुस्तकात लिहून झाल्यानंतर आपल्या पुस्तकात आणखीन दोन नवीन पानावर याबद्दलचा सारांश एका मजेदार स्वरूपात लिहायचा आहे.


सारांश लिहिताना एकदा पुस्तक तपासून पहा कि आपल्या संपूर्ण पुस्तकात आपण किती फळांची नावे लिहिली आहेत? त्यांपैकी किती फळांचा रंग हा हिरवा असतो? किती फळांचा रंग हा पिवळा असतो? किती फळांचा रंग हा लाल असतो? किती फुलांची नावे लिहिली आहेत? किती भाज्यांचा कलर हा हिरवा असतो? एकूण किती प्राण्यांची नवे आपण लिहिली आहेत? त्यांपैकी किती प्राणी हे जमिनीवर राहतात? किती प्राणी हे पाण्यामध्ये

राहतात? किती पक्ष्यांचा आपण उल्लेख केलेला आहे? त्यांपैकी किती पक्ष्यांचा आपण पाळीव पक्षी म्हणून उल्लेख करतो? अशा कितीतरी प्रकारे आपल्याला या पुस्तकातील शब्दांचे वर्गीकरण करता येईल. हे वर्गीकरण करत असताना आपण एक तक्ता बनवून चित्रांच्या माध्यमातून देखील त्याचे सादरीकरण करू शकतो. उदाहरणादाखल आपण हे सादरीकरण पुढील प्रमाणे दाखवू शकतो.

| Colours | Food Items | | | Total |
|---|---|---|---|---|
| Green |  | | | 1 |
| Red |  |  |  | 3 |
| Yellow |  | | | 1 |
| Orange |  |  | | 2 |
| Brown |  | | | 1 |

असेच विविध प्रकारचे सादरीकरण तुम्हाला पुस्तकाच्या पुढील दोन पानात करावयाचे आहे. अशा रीतीने तुमच्या पुस्तकाचे साधारण ९ ते १० पाने तयार होतील.

आता तुम्हाला या पुस्तकाचे एक कव्हर पान म्हणजेच सगळ्यात पहिले पान आणि सगळ्यात शेवटचे पान तयार करायचे आहे. ही दोन पाने तयार करण्यासाठी तुम्ही कोणतेही एखादे जुने पुस्तक पाहून त्यावरील माहिती वाचून पहा. यात सर्वात वरच्या पानावर पुस्तकाचे एक नाव लिहिलेले असते अगदी तशाच प्रकारे तुम्ही तुमच्या पुस्तकासाठी एक छानसे शीर्षक निवडा त्यानंतर त्यावर पुस्तकाच्या लेखकाचे आणि प्रकाशकाचे नाव लिहिलेले असते. आणि तुम्ही बनवलेल्या पुस्तकाचे लेखक तर तुम्ही स्वतः आहात आणि खरतर प्रकाशक देखील तुम्ही स्वतःच आहात पण आपण प्रकाशक म्हणून तुम्ही तुमच्या घरातील एखाद्या मोठ्या व्यक्तीचे किंवा शिक्षकाचे नाव टाकले तर ते जास्त योग्य होईल. आणि पुस्तकाच्या शेवटच्या पानावर पुस्तकाची किंमत आणि पुस्तक कुठे तयार झाले आहे याचा पत्ता



असतो. तुमच्या पुस्तकाची किंमत तुम्ही तुमच्या शिक्षकांना विचारून ठरवा आणि पत्ता तर तुमच्या घराचा किंवा शाळेचाच येईल, हो ना?

**हुर्रे! आता तुमचे स्वत:चे पुस्तक पूर्णपणे तयार झाले आहे. हे पुस्तक तुमच्या घरातल्या सर्व व्यक्तींना दाखवा त्यांना पूर्ण वाचायला सांगा, त्यात आणखी काही बदल आवश्यक आहेत का हे विचार. काही बदल सुचविले असल्यास त्याप्रमाणे योग्य ते बदल करून नवीन पुस्तक तयार करा. तुमचे शिक्षक तुमचे सर्व पुस्तक पाहून एकंदरीत त्यांचा अभिप्राय देतील. त्यामध्ये अक्षर, एखाद्या शब्दाची स्पेलिंग, एखाद्या चित्रातील बदल, अक्षरांची व्यवस्थित ठेवण या गोष्टीवर आधारित मूल्यांकन असेल. या मूल्यांकनावर आधारित अपेक्षित बदल करून आणखीन यापेक्षा छान पुस्तक तयार करण्याचा प्रयत्न करा.**